World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2017;3(12):501-503
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती धर्माबद्दल असलेले गैरसमज'':- (भाग-२)

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**

In Christianity, to reject idolatry means to have an evil heart and to put Christ second. The first commandment is the Ten Commandments. 'You must have no other god than me.' This means that Christ must be first in every aspect of a Christian's life. First Christ, then family does not mean enmity with idolaters. Instead, Christ offered his sacrifice for the sins of all mankind. washed away their sins. Loved it. The Bible teaches us to love non-Christians. Christianity is not just about idolatry. But those who do devotion by worshiping idols. They do not mistreat them, they do not hate them, they preach Christ so that they may receive His mercy, love and joy.

Good deeds are done by a true Christian. For if you do good and you do not, it is a sin. But Christianity and the Church stand by the grace of God. No one will be saved according to his deeds, but by the grace of God. To do good for others is to serve Christ. But only God's grace is important for personal salvation.

**Keywords:** Christianity, Christ, Jesus Christ, Christian, God, Scripture, Christians, Religion, Grace, Salvation

**प्रस्तावना:**

१. **ख्रिस्ती धर्म मूर्तीपूजेचा विरोधी आहे का ?**

ख्रिस्ती धर्मात मूर्तिपूजेचे खंडन म्हणजे वाईट हृदय आणि ख्रिस्ताला दुय्यम स्थान देणे होय.दहा आज्ञेत प्रथम आज्ञा आहे. 'मला सोडून तुला अन्य देव नसावे.' याचाच अर्थ एका ख्रिस्ती व्यक्तीच्या जीवनातील प्रत्येक घटकात ख्रिस्त हा प्रथमस्थानी असायला हवा. प्रथम ख्रिस्त, मग परिवार याचा अर्थ मूर्तीपूजा करणाऱ्या लोकांशी वैर करणे हा होत नाही. उलट ख्रिस्ताने संपूर्ण मानवजातीच्या पापासाठी आपले बलिदान दिले. त्यांचे पापक्षालन केले. त्यांना प्रीती केली. बायबलचे शिक्षण ख्रिस्तीतेर लोकांवर प्रीती करावयास शिकविते. ख्रिस्ती धर्म फक्त मूर्तीपूजा करीत नाही. पण मुर्तीपुजेच्या माध्यमातून जे भक्ती करतात. त्यांच्याशी गैर वर्तणूक करीत नाही, घृणा करीत नाही, त्यांना ख्रिस्ताची दया, प्रीती आणि आनंद प्राप्त व्हावा यासाठी ते ख्रिस्ताचा प्रचार करतात.

२. **ख्रिस्ती धर्म मद्यप्राशन करणारा आहे का ?**

ख्रिस्ती धर्मात प्रभूभोज घेत असताना ख्रिस्ती पाळक आणि विश्वासू लोक वाईन अथवा दारू पितात असा गैरसमज काही ख्रीस्तीतेर लोकांचा आहे. प्रभूभोज विधी हा ख्रिस्ताचा स्मरणात घेतला जातो आणि त्यासाठी शुद्ध, पवित्र हृदय आणि आत्म्याद्वारे प्रभूभोज विधी घेणे महत्वाचे आहे. पावित्र्य टिकविण्यास ते बळ देते. खेड्यापाड्यातील स्थानिक मंडळीत तर सरबत किंवा पाणी चा वापर करून भाकरीचा तुकडा घेतला जातो. ज्या चर्चमध्ये द्राक्षरस वापरला जातो. ती माईल स्वरूपाची वाईन असते. इस्त्राएल राष्ट्रामध्ये द्राक्षांचे मळे करण्याची शेती प्राचीन काळापासून चालत आलेली आहे आणि त्यातूनच इस्त्राएलचे लोकद्राक्षरस बनवीत होते. ख्रिस्ती धर्मात मद्यप्राशानास पूर्ण विरोध आहे. बायबलमध्ये अशी अनेक वचने आहे. ती मद्यप्राशन करण्यास विरोध करते. "द्राक्षरस घट्ट करणारा आहे. मद्य कलागत करणारे आहे. जो कोणी त्याने झिंगतो, तो सुज्ञ नाही. (प्रीतीवचन २०:१) मद्याच्या मागे लागावे म्हणून जे मोठ्या पहाटेच उठतात आणि द्राक्षरस त्यांना धुंद करेपर्यंत मोठ्या रात्रीही पीत राहतात. त्यांना हाय हाय (याशाया ५:११) जो आपल्या शेजाऱ्याला मद्य प्यायला देतो, त्याला हाय हाय म्हणून त्याचे नग्नपण

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

पाहावे म्हणून आपले त्याला घालून जो त्याला मस्त करतो. त्याला हाय हाय (हबवकुक २:१५)"१ ख्रिस्ती धर्मात मद्य प्राशनाला संपूर्ण विरोध आहे. तरी काही ख्रिस्ती लोकांचा चुकीच्या जीवनशैलीमुळे संपूर्ण ख्रिश्चन लोकांना दोष दिला जाऊ शकत नाही. ख्रिस्ती धर्मांतरित लोक आपले पावित्र्य टिकवून चालतात यात दुमत नाही.

### ३. ख्रिस्ती कुटुंबात जन्म झाला म्हणून तुम्ही ख्रिस्तानुयायी बनतात का ?

पवित्रशास्त्रात स्पष्ट म्हटले आहे, 'देवाने जगावर एवढी प्रीती केली कि त्याने आपला एकुलत्या एक पुत्र दिला. यासाठी कि कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो. त्याचा नाश होऊ नये तर त्याला सर्वकालचे जीवन असावे.' कोणीही ख्रिस्ती कुटुंबात जन्म घेतल्यावर तारण मिळवू शकत नाही. तारणाची आणि खऱ्या ख्रिस्तीपणाची लक्षणे तेव्हाच प्राप्त होतात, जेव्हा कोणी येशु ख्रिस्तावर प्रभू म्हणून विश्वास ठेवतो. नंतर पश्चाताप, पाण्याचा आणि पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा जीवन पवित्रशास्त्राच्या शिक्षणावर आधारलेले नवीन जीवन जगतो. असा व्यक्ती जन्माने नव्हे तर विश्वासाने ख्रिस्ताचा ख्रिस्तानुयायी म्हणून उदयास येतो.

आज अनेक मंडळीत वंशपरंपरेने पाळक पद दिले जाते. पाळक पदाच्या कसोट्या या पवित्रशास्त्रावर आधारलेल्या पाहिजे आणि त्यासाठी संत पॉलने लिहिलेली पत्र तुम्हाला आध्यात्मिक योग्यता प्राप्त करण्यास मदत करते.

### ४. ख्रिस्त तमिळ ब्राम्हण होता असा गैरसमज :-

बाबाराव सावरकर यांनी लिहिलेले 'ख्रिस्त परिचय अर्थात ख्रिस्ताचे हिंदुत्व' हे पुस्तक येशू ख्रिस्ताचा तमिळ ब्राम्हण म्हणून उल्लेख करते. येशू ख्रिस्ताने वयाच्या १२ ते ३० वर्षादरम्यान भारतात येऊन हिंदू धर्माची साधना केली आणि आध्यात्मिक स्वरूपात स्वताला तयार केले. असा आशय या पुस्तकात मांडण्यात आलेला आहे. या पुस्तकात मांडण्यात आलेले सर्व निष्कर्ष आणि आशय खोटे आहे. कारण बायबलच्या नवीन कराराच्या पहिल्या चार पुस्तकात येशू ख्रिस्ताचे संपूर्ण जीवनचारित्र्य शुभवर्तमान च्या स्वरूपात दिलेले आहे. त्यात येशू ख्रिस्ताबद्दल पूर्वभविष्यवाण्या जन्म, कार्य, क्रुसीकरण, मृत्यू, पुनरुत्थान आणि स्वर्गारोहण इत्यादी गोष्टी दिलेल्या आहे. तसेच ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या अनेक इतिहासकारांनी त्या घटना प्रस्तुत केलेल्या आहे.

येशू ख्रिस्ताचे ब्राह्मणीकरण हा एक खोटा सिद्धांत आणि इतिहास असून त्यातून काहीच साध्य होणार नाही. कारण आजही इस्त्राएलमध्ये येशू ख्रिस्ताची कंबर खाली पडलेली आहे. ख्रिस्तासंबंधी असलेली सर्व ऐतिहासिक स्थळे जतन केली गेलेली आहे आणि सर्वात मोठा पुरावा आणि प्रमाण पवित्रशास्त्र आहे.

### ५. ख्रिस्ती धर्माकडून पैशाचे आमिष दाखविले जातात असा गैरसमज :

हे संपूर्णतः असत्य असून अशा प्रकारे कोणत्याही धर्मावर लांछन लावणे कोणत्याही व्यक्तीसाठी अशोभनीय आहे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुधारणा करणे हे ख्रिस्ती अनुयायांचे धर्मकर्तव्य आहे आणि हे अनेक शतकांपासून सुरू आहे. पवित्रशास्त्रात संत पॉल गरिबांची काळजी घेताना म्हणतो, "सध्या तर मी पवित्राची सेवा करीत असता येरुसलेम जातो. कारण येरुसलेमातील पवित्र लोकांतल्या गरिबांसाठी काही वर्गणी गोळा करावी."२ संत पॉल मंडळीतुन काही वर्गणी गोळा करून तिचा वापर गरीब लोकांसाठी करीत आहे. आधुनिक मंडळीत देखील धर्मप्रचारक फक्त ख्रिस्ताचा संदेश व प्रचार करीत नाही तर ते गरीब आणि दुबळ्या लोकांची सेवा करतात. याचा अर्थ आमिष दाखवून धर्मांतरण करणे हा होत नाही.

ख्रिस्ती धर्मातील चर्च ही एक आध्यात्मिक संस्था असली तरी गरीब आणि लाचार लोकांसाठी कार्य करणारी सामाजिक संस्थादेखील आहे. ख्रिस्ताने फक्त आध्यात्मिक शिक्षणच दिले नाही तर लोकांच्या पोटाची काळजी घेतली. (उदा. दोन मासे पाच भाकरी) त्यामुळे दीनदुबळ्या लोकांना भाकर, कपडे, शिक्षण, आरोग्य इत्यादी घटक उपलब्ध करून देणे म्हणजे आमिष दाखवणे असे होत नाही. तसेच काही लोक म्हणतात, ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यामुळे लग्न लावून दिले जाते, घर-गाडी इत्यादी बहुतेक वस्तूंची सोय करून दिली जाते. हा प्रचार देखील पूर्ण खोटा आहे. ख्रिस्ती धर्मात असे कोणतेच प्रकार होत नाहीत. फक्त ख्रिस्ती वधू-वर मेळावा होतो आणि त्यात देखील मुला-मुलींची आणि परिवाराच्या परवानगीने लग्न लावले जाते. उलट या मेळाव्यात पैशांचा काडीमात्र संबंध नसतो. मुले-मुली एकमेकांबद्दल असलेले अध्यात्मिक गुण पाहून एकमेकांची निवड करतात. त्यात घर, गाडी यांचा काहीच संबंध येत नाही. असे आरोप लावणे हे माहिती तंत्रज्ञान आणि बुद्धिवादी युगात तरी मूर्खपणाचे आहे.

### ६. ख्रिस्ती धर्म पक्षपाती आहे का असा गैरसमज ?

ख्रिस्ती धर्म हा मानवतावादी आणि सेवाभावी धर्म आहे. जात, धर्म, वंश यांच्या नावावर ख्रिस्ती धर्माने कधीही कोणत्याच अनुयायाला त्यात छळले जात नाही. मदर तेरेसा, जॉर्ज मुल्लर, विली ग्रॅहम, फ्लॉरेन्स नाइटिंगेल, पंडिता रमाबाई आणि अशी हजारो लाखो उदाहरणे आणि व्यक्ती चरित्रे मिळतील. ज्यांनी आपल्या सेवाभावी कार्याने संपूर्ण जगाला वेधून घेतलेले आहे. भरपूर लोक ख्रिस्ती धर्मावर आरोप लावतात हा पक्षपाती धर्म आहे. पण खरे पाहता जगात दुसऱ्या धर्माचा आणि लोकांचा सर्वात जास्त सन्मान करणारा धर्म हा ख्रिस्ती धर्मच आहे.

मनुष्य कल्याणार्थ हा धर्म कार्य करतो. भारतात जातीसंस्थेचे जटिल जाळे तोडण्याचे कार्य ख्रिस्ती मिशनऱ्यांनी केले. भलेही भारतात धर्मांतरीत होणारा प्रथम वर्ग ब्राह्मण होता. पण दलित आणि आदिवासी लोकांना ख्रिस्ती मिशनऱ्यांनी प्रथमस्थान दिले. त्यांना शिक्षण, आरोग्य इत्यादी सुविधा उपलब्ध करून सन्मानार्थ जगण्यास उभे केले आणि त्यामुळे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी कधीही पक्षपात केला नाही. त्यामुळे दलित आणि आदिवासी समाज सर्वात जास्त ख्रिस्ती धर्माकडे आकर्षिला गेला. कारण त्यांना समानतेची आणि हक्काची वागणूक ख्रिस्ती मिशनऱ्याकडून मिळत होती. आपुलकीची आणि पारिवारिक छत्र मिळाल्यामुळे धर्मांतरित लोक ख्रिस्ती धर्मात आनंदाने प्रवेश करीत होते, कारण ख्रिस्ती धर्म निपक्षपाती होता.

### ७. ख्रिस्ती धर्म कर्मावर आधारलेला धर्म आहे का ?

ख्रिस्तीतेर लोकाना ख्रिस्ती धर्माची समाजहीततत्वे कार्य पाहून वाटते की, हा धर्म कर्मावर आधारलेला आहे. पण खरे पाहता ख्रिस्ती धर्माचा मुख्य आधार हा ख्रिस्त आणि पवित्रशास्त्र आहे. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीचे तारण हे कर्माने नव्हे तर देवाच्या कृपेने झालेले आहे आणि ही कृपा देवाच्या प्रीतीवर आधारित आहे. देवाची कृपा एवढी मोठी आहे की, त्याने आपला एकुलता एक पुत्र जगाच्या पापक्षालनासाठी दिला. ही देवाची दया, प्रीती आणि कृपा आहे. पॅमेला फिब्रान म्हणतात, "आपल्या पापाबद्दल ऋणी म्हणजे ख्रिस्ताचे मरन ही खंडणी म्हणजे ख्रिस्ताचे रक्त, असे नव्या करारात सांगितले आहे. ख्रिस्ताचे रक्त त्याचे मरण दर्शविते.

त्याच्या रक्ताने त्याने आम्हाला विकत घेतले म्हणून आमच्यावर त्याचा हक्क आहे."[३]

चांगली कृत्ये ही खरा ख्रिस्ती व्यक्ती करतोच. कारण चांगले करणे तुला जमत असेल आणि ते तू करत नाही तर ते पाप आहे, असे शास्त्रवचन सांगते. पण ख्रिस्ती धर्म आणि मंडळी देवाच्या कृपेवर उभी आहे. कोणालाच त्याच्या कर्माप्रमाणे मोक्ष भेटणार नाही तर देवाच्या कृपेवर मोक्ष भेटणार. इतरांसाठी चांगली कर्मे करत जाणे म्हणजे ख्रिस्ताची सेवा करणे होय. पण व्यक्तिगत तारणप्राप्तीसाठी फक्त देवाची कृपाच महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भसूची:-**

1) पवित्रशास्त्र, पंडिता रमाबाई, प्रकाशक : रमाबाई मुक्ती मिशन, कडेगाव, पुणे.
2) रोमकरास पत्र, अध्याय १९, वचन २५, पवित्रशास्त्र.
3) ख्रिस्ती धर्मसिद्धांताचा परिचय, पामेला फिब्रोन, जीवनवचन प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९९२, पृ.क्र. १२९.